अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत स्थानिक अन्नघटकाचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१९/प्र.क्र.५१/का-८,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २०१९

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१५/प्र.क्र.७८/का-८, दि.१८ नोव्हेंबर,२०१५
२) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१५/प्र.क्र.७८/का-८, दि.३० नोव्हेंबर,२०१५
३) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१५/प्र.क्र.१०७(भाग-२)/का-८, दि.१८ मार्च,२०१६
४) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१६/प्र.क्र.६६/का-८, दि.२ ऑगस्ट,२०१६
५) शासन निर्णय क्रमांक: आविवि २०१६/प्र.क्र.८३/का-८, दि.५ ऑगस्ट,२०१६
६) शासन निर्णय क्रमांक: आविवि -२०१८/प्र.क्र. ४/का-८, दि.२२ जून, २०१८
७) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित यांचे पत्र क्र.आविम/विप/प्रशा/२४३६/१९ दि. १८ जून,२०१९

प्रस्तावना-

अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना संदर्भाधिन दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ व ३० नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे. तर दिनांक २ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये या योजनेंतर्गत स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत व बाळंतपणानंतर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी एक वेळ आहार देण्यात येत आहे.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना देण्यात येत असलेल्या आहारातील अन्नघटकात स्थानिक अन्नघटकांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१) भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना देण्यात येत असलेल्या चौरस आहारातील आहार घटकात सामाविष्ट असलेल्या शेंगदाणा लाडू ऐवजी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या मोहाफुल,डिंक,नागली,वरई अशा स्थानिक वनउपज व शेतमालापासुन उपलब्ध होणाऱ्या पौष्टीक पदार्थाचा उपयोग करुन तयार केलेला लाडुचा आहारामध्ये प्रायोगिक तत्वावर समावेश करण्यास एकात्मिक बालविकास प्रकल्प, कळवण या प्रकल्पाअंतर्गत अंगणवाड्या क्षेत्रामध्ये राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे .

२) स्थानिक वनउपजापासून तयार करण्यात आलेल्या लाडुचे वजन ४० ग्रॅम इतके तर किंमत रू.५ /-इतकी राहील.

३) स्थानिक वनउपजाचा वापर करून महिला बचत गटामार्फत लाडू तयार करण्यात यावा. सदरचा लाडू अंगणवाडी सेविकांनी महिला बचत गटाकडून खरेदी करावा.

४) महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत महिला बचत गटांनी लाभार्थीना लाडुचा पुरेशा प्रमाणात पुरवठा होईल याबाबत दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२०११४८५७११२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Laxmikant
Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development
Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ff
ac4dfc,
serialNumber=e714bbcd4d43c6782884c7e7a2091f9f1edc1d97ebb542c48b9
8fb8c8bdd6cf4, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2019.08.20 12:29:04 +05'30'

(ल. गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग,मंत्रालय, मुंबई
१३) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१४) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,पुणे
१५) व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ,मुंबई.
१६) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक
१७) महासंचालक, राजमाता जिजाऊ पोषण मिशन, नवी मुंबई
१८) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, सार्वजनिक आरोग्य संचालनालय,मुंबई
२०) सर्व विभागीय आयुक्त
२१) जिल्हाधिकारी नाशिक
२२) युनिसेफ राज्यप्रमुख, मुंबई
२३) स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी
२४) सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
२५) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२६) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प (१६ जिल्हे)
२७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण, जिल्हा परिषद
२८) सर्व सहसचिव /उपसचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

* * * * * * *